# विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई

## प्रशंसनिय अहवाल

## सन—२०२५

विक्रोळी पोलीस ठाणे गु.र.क्र १६९/२०२५ कलम — ३०९ (६) ३(५) भारतीय न्याय संहिता या गुन्हयातील आरोपीस मोठया शिताफिने पकडुन नमुद गुन्हयात अटक तसेच गुन्हयातील चोरीस गेलेली संपुर्ण मालमत्ता हस्तगत केली.

विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई,
दिनांक:—      /   /२५

# “ प्रशंसनिय अहवाल ”

मा. महोदय,

विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई सदर गुन्हयातील फिर्यादी नामे श्री स्वप्निल लक्ष्मण भाबुदे, वय ४० वर्षे, धंदा — नोकरी, राठि रूम नंबर ४०१, प्रभावती कुंभ, गव्हाणपाडा, मुलूंड पुर्व, मुंबई ८१ हे त्यांची मोटार सायकल क्रमांक एम एच ०३ डी बी ९४३२ घेवुन दिनांक ०४/०४/२०२५ रोजी रात्रौ १०:४५ वा च्या सुमारास दादर ते मुलूंड असा प्रवास मुंबई ठाणे पुर्व द्रुतगती महामार्गाने करत असतांना भांडुप गाव बस स्टॉपच्या आधी अंदाजे ३०० मीटर अंतरावर फिर्यादी यांच्या गाडीची धडक रोडच्या बाजुला उभ्या असलेल्या निळया रंगांच्या ॲक्टिवा स्कुटरला झाल्याने सदर गाडीचे नुकसान झाले त्यामुळे ॲक्टिवा स्कुटर चालक व त्याचेसोबत असणारा इसम यांनी त्यांच्या गाडीचे नुकसान भरपाई दयावी म्हणुन फिर्यादी यांना हाताने मारहाण करून फिर्यादी यांचा मोबाईल व मोटार सायकल जबरीने चोरी करून नेली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गु र क्र १६९/२०२५ कलम ३०९ (६), ३(५) भा न्या सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपींचा शोध घेणेकरीता पोनि अनिल जायकर, पोलीस सहा पोलीस निरीक्षक गिरीश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक पंकज पाटील, पो.ह.क्र ०७१२७८/सोनजे, पो.ह.क्र ०७१३२६/आव्हाड, पो.शि.क्र ०९०९९२/कोळेकर, पो.शि.क्र ०९२०६३/शिरसाठ, पो.शि.क्र ०९३५२६/मोटे, पो.शि.क्र ११०३६६/गाडेकर, पो.शि.क्र १११७८८/रणखांबे, पो.शि.क्र १३०५१६/उंडरे, महिला पोलीस शिपाई क्र ०९१२१४/हाडवले, यांनी सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने तात्काळ मा. अप्पर पोलीस आयुक्त डॉ महेश पाटील सो, पुर्व प्रादेशिक विभाग चेंबुर मुंबई. मा. पोलीस उप आयुक्त, विजयकांत सागर सो, परिमंडळ —७, मलुंड मुंबई, मा. सहा पोलीस आयुक्त प्राची कर्ण सो, विक्रोळी विभाग, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुर्यकांत नाईकवाडी सो, विक्रोळी पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे अनिल जायकर, व गुन्हे प्रकटीकरण अधिकारी यांचे वेगवेगळी पथके बनवुन सदर गुन्हयाचा तपास चालू करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या घटनास्थळावरील तसेच आजुबाजुचे सरकारी व खाजगी सिसीटिव्ही कॅमे—याचे फुटेज तपासुन तसेच गोपनीय बातमीदारांची मदत घेवुन आरोपी नामे ०१) वेदांत सचिन येरम, वय २३ वर्षे, धंदा — खाजगी नोकरी, राठि रूम नंबर ७०१, सातवा माळा, अंबिका टॉवर, टेकडी बंगला, पाचपाखाडी, ठाणे, पश्चिम ४००६०२. (कायमचा पत्ता — १/बी/७०४, म्हाडा गुलमोहर बिल्डींग, कन्नमवार नगर २, विक्रोळी पुर्व, मुंबई) ०२) कुणाल मुकेश सोंडकर, वय २३ वर्षे, धंदा — नोकरी, राठि बी विंग, ७०१, शिवहर प्लाझा, शिवाईनगर, ठाणे पश्चिम यांना ताब्यात घेवुन त्याच्याकडे नमुद गुन्हयाच्या अनुशंगाने चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना मा. सर्वोच्च्य न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करून अटक करण्यात आली.

तसेच पोलीस कोठडी दरम्यान पोलीस कोठडीमध्ये असतांना दोन्ही आरोपीतांना अधिक विश्वासात घेवुन त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक तपास केला असता यातील आरोपी नामे वेदांत सचिन येरम याने स्वेच्छा निवेदन देण्याची तयारी दर्शविली असता तात्काळ दोन लायक पंचांना पाचारण करून नमुद आरोपीताचे निवेदन पंचासमक्ष नोंदवुन त्याने केलेल्या निवेदनाप्रमाणे जावुन निवेदन पंचनामा करून नमुद गुन्हयातील चोरीस गेलेली खालील मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

निवेदन पंचनाम्याअंतर्गत हस्तगत केलेल्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे —

०१) एक रेडमी नोट ९ प्रो कंपनीचा, फिकट निळा रंगांचा, सिम नंबर ९८२१८२०९४७. त्याची किंमत अंदाजे १२,०००/— रूपये

०२) एक होंन्डा शाईन मोटार सायकल क्रमांक एम एच ०३ डी बी ९४३२, वर्ष २०१८,
इंजिन क्रमांक JC६५E७२३३२६७४ चेसिस क्रमांक ME४JC६५BKJ७११५३७३.
अंदाजे किंमत ५०,०००/— रूपये

०३) एक होंन्डा ॲक्टिवा मोटार सायकल क्रमांक एम एच ०४ एम के ३६५८,
अंदाजे किंमत ६०,०००/— रूपये

---

**एकूण किंमत अंदाजे १,२२,०००/— रूपये**

नमुद मालमत्ता पंचासमक्ष ताब्यात घेवुन ती सुरक्षितरित्या पोलीस ठाणेस आणुन बीएनएस मुददेमाल नोंदवहीमध्ये ८५/२०२५ अन्वये नोंद घेवुन सदर मालमत्ता मुददेमाल कारकुन यांचेकडे जमा करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील वर नमुद आरोपीतांकडुन चोरीस गेलेली संपुर्ण मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे.

**तरी बाजुस नमुद पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेकडून भविष्यात अशाच प्रकारची चांगली कामगिरी व्हावी या करीता त्यांना उत्तेजनार्थ रोख बक्षिस व प्रशस्तीपत्र देवून गौरव करावा अशी शिफारस करीत आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विक्रोळी पोलीस ठाणे, मुंबई.
जावक क्र. /२०२५,
दिनांक— २६/०४/२०२५